संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११२८/२०२२
(MHST-1400-2424-2022)
नि.

महाराष्ट्र शासन .... अभियोग पक्ष

**विरूध्द**

प्रशांत प्रकाश लंगुटे, वगैरे .... आरोपी

: **न्यायनिर्णय** :

घोषीत दिनांक ३१.०८.२०२३

आरोपींविरूध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ), ४, ५ अन्वये अपराध केलेबाबत खटला चालविण्यात आला.

**०२.** प्रस्तुत खटल्याचे निर्णया करीता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी दि.२६.०२.२०२२ रोजी १७.३० वा. सुमारास मौजे गुणवरे, ता.फलटण जि.सातारा गावातील रामोशीवस्ती मधील गोडाऊनचे पाठीमागे आरोपी क्र.२ चे मालकीचे पत्र्याचे शेडमध्ये बेकायदा, बिगरपरवाना स्वत: चे फायद्याकरिता चक्री नावाचा मटका टेबलवरील आकडयावर लोकांचेकडून पैजेवर पैसे स्वीकारुन मटका कॉम्प्युटरच्या सहाय्याने | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | घेत असताना त्यांच्या ताब्यातून जुगाराचे साहित्य एकूण र.रु.१,२८,४६०/- चे मिळून आले आणि त्यानुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १९८७ चे कलम १२(अ), ४, ५ अन्वये अपराध केला ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केले काय ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**०३.** आरोपींवरील आरोप शाबीत करण्याकामी अभियोगपक्षातर्फे एकुण तीन साक्षीदार तपासणेत आले. साक्षीदार क्र.१ पंच बबन बापू टेंबरे, **नि.१३** खाली, पंच साक्षीदार क्र.२ लतिफ दादा शेख यांना **नि.१३** खाली, फिर्यादी साक्षीदार क्र.३ बबन रघुनाथ साबळे यांना **नि.१३** खाली तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे तोंडी पुराव्यासोबत कागदोपत्री पुरावा म्हणून दि.२६.०२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यातील पंचाच्या सहीला **नि.१६** व **नि.१७** देण्यात आली. तसेच दि.२६.०२.२०२२ रोजीच्या फिर्यादीस **नि.१९** देण्यात आली.

### मुद्दा क्र.१ बाबत

**०४.** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द सदरचा खटला शाबीत करण्याकरीता फिर्यादी साक्षीदार क्र.३ बबन रघुनाथ साबळे यांना तपासण्यात आले. त्यात त्यांनी दि.२६.०२.२०२२ रोजीते बरड दूरक्षेत्र या ठिकाणी कार्यरत असताना ए.पी.आय. सोनावणे यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन त्यांनी घटनास्थळी दोन पंचासह छापा टाकला होता. घटनास्थळी असणा-या पत्र्याच्या शेडमधील चार इसम पुर्वेच्या दरवाजाने ऊसाच्या शेतात पळून गेले. चारपैकी एका इसमाला त्यांनी पकडले असता त्याने त्याचे

नाव प्रशांत लंगुटे असे सांगितले व त्या ठिकाणी सागर जाधव व रोहित पवार व एक अनोळखी इसम चक्री नावाचा मटकाटेबलवरील आकडयांवरुन लोकांचेकडून पैजेवर पैसे स्वीकारुन संगणकाच्या सहयाने घेत असल्याचे सांगितले. मटका घेण्यासाठी त्यांच्याकडे कोणतीही परवागनी नव्हती. प्रशांत लंगुटे हा त्या ठिकाणी मजूर म्हणून काम करीत होता. घटनास्थळावरुन कंप्यूटर, प्रिंटर, माऊस, कि बोर्ड, दोन टेबल, दोन खुर्ची, दोन जार, दोन ग्लास तसेच आकडे लिहलेले टेबलवरील प्लेक्स बोर्ड व रोख र.रु.७६०/– जप्त करुन त्याचा पंचनामा केला. त्यानंतर नि.१९ प्रमाणे फिर्याद दाखल केली होती.

०५. आरोपीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यांनी घटनास्थळाच्या मालकीबाबत व घटनास्थळाच्या चतुःसिमा तसेच पंचाची नावे सांगता येणार नसल्याचे मान्य केले.

०६. सदर खटल्यात पंचनामा सिध्द करण्याकरीता पंच साक्षीदार क्र. १ बबन बापू टेंबरे व पंच साक्षीदार क्र.२ लतिफ दादा शेख यांना तपासण्यात आले. त्यांनी दि.२६.०२.२०२२ रोजी बरड पोलिसांनी पोलिस ठाण्यात पंचनाम्यावर सही घेतल्याचे कथन केले आहे. त्यांनी पंचनाम्यातील मजकूर नाकारला व नि.१६ व नि.१७ प्रमाणे त्यांच्या सहया मान्य केल्या. अभियोग पक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेवून देखील त्यांनी आरोपींविरुध्द कोणतीही आरोपसदृश्य विधाने केली नाहीत. सदर खटल्यात तपासीक अधिकारी यांना साक्षीसमन्स काढूनही त्यांची साक्ष अभिलेखावर न आल्याने नि.१ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींचा फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणेचा जबाब नोंदवण्यात आला. आरोपींनी सर्व प्रश्नांची उत्तरे हे म्हणणे खोटे आहे या स्वरुपात दिली.

०७. उपरोक्त पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, सदर खटल्यातील फिर्यादी यांचे साक्षीला पंच साक्षीदारांनी दुजोरा न दिल्याने फिर्याद अभिलेखावर निःसंशय सिध्द होवू शकली नाही. तसेच पंच साक्षीदारांनी पंचनाम्यातील मजकुर नाकारुन त्यांची सही मान्य केल्याने जप्ती पंचनामा सिध्द होवू शकला नाही. सदर खटल्यातील तपासीक अधिकारी

यांना साक्षीसमन्स काढूनही ते न्यायालयात साक्षीकाम हजर न राहिल्याने खटल्याचे तपासकार्य अभिलेखावर येवू शकले नाही. सबब, पंच साक्षीदाराने पंचनाम्यातील मजकूर नाकारल्याने घटनास्थळी आरोपी हजर होते व पैसे घेवून संगणकावरती चक्री नावाचा मटका घेत होते याबाबत संशय निर्माण होतो. सबब, आरोपी घटनास्थळी स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता पैसे लावून संगणकावर चक्री नावाचा मटका घेत असताना मिळून आले व त्यांच्याकडून रोख र.रु. ७६०/–, दोन मोबाईल व एच.पी. कंपनीचा सी.पी.यु., पॉइंट कंपनीचा की बोर्ड केबलसह, माऊस, रिअल पोस कंपनीचा प्रिंटर केबलस, स्कॅनर, ए.पी. कंपनीचा मॉनेटर, एक रिमोट, दोन लाकडी इलेक्ट्रीक बोर्ड, इंग्रजीत आकडे लिहलेला लाकडी टेबल, इंग्रजी आकडे लिहलेला रंगीत फ्लेक्स बोर्ड, इंग्रजी लिहलेले तीन पुठ्ठयांचे बोर्ड, ए.जी.ई कंपनीचा एल.ई.डी. टिव्ही, प्लॅस्टीकचा टेबल, दोन प्लॅस्टीकच्या खुर्चा, लोखंडी कॉट, दोन पाण्याचे जार, दोन स्टीलचे ग्लास, एक पत्र्याची पेटी, एक सीलींग फॅन जप्त केले होते हे अभिलेखावर निर्विवाद सिध्द होवू शकले नाही. सबब, आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र असून मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी देवून मुद्दा क्र.२ करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ प्रशांत प्रकाश लंगुटे रा. बरड, ता.फलटण जि.सातारा, आरोपी क्र.२ सागर विठ्ठल जाधव रा.गुणवरे, ता.फलटण जि.सातारा, आरोपी क्र.३ रोहित अशोक पवार रा.सोमवारपेठ, फलटण ता.फलटण जि.सातारा, आरोपी क्र.४ नागु दिपक कु–हाडकर रा.गुणवरे, ता.फलटण जि.सातारा यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष ठरवून त्यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ), ४, ५ या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचा जातमुचलका व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल एच.पी. कंपनीचा सी.पी.यु., पॉइंट कंपनीचा की बोर्ड केबलसह, माऊस, रिअल पोस कंपनीचा प्रिंटर केबलस, स्कॅनर, ए.पी. कंपनीचा मॉनेटर, एक रिमोट, दोन लाकडी इलेक्ट्रीक बोर्ड, इंग्रजीत आकडे लिहलेला लाकडी टेबल, इंग्रजी आकडे लिहलेला रंगीत फ्लेक्स बोर्ड, इंग्रजी लिहलेले तीन पुठ्ठयांचे बोर्ड, ए.जी.ई कंपनीचा एल.ई.डी. टिव्ही, प्लॅस्टीकचा टेबल, दोन प्लॅस्टीकच्या खुर्चा, लोखंडी कॉट, दोन पाण्याचे जार, दोन स्टीलचे ग्लास, एक पत्र्याची पेटी, एक सीलींग फॅन हे मुळ मालकास परत देण्यात यावेत अथवा न्यायालयीन आदेशाप्रमाणे मुळ मालकाला परत देण्यात आलेले असल्यास अपील कालावधी नंतर ते त्यांच्याकडेच ठेवणेत यावे.

४. जप्त असलेली रोख रक्कम रू.७६०/– ही अपील कालावधी नंतर सरकार जमा करणेत यावी.

५. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल दोन एम.आय. कंपनीचे मोबाईल मुळ मालकास परत देण्यात यावे अथवा न्यायालयीन आदेशाप्रमाणे मुळ मालकाला परत देण्यात आलेले असल्यास अपील कालावधी नंतर ते त्यांच्याकडेच ठेवणेत यावा.

६. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ अन्वये प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चे वैयित्तक बंधपत्र द्यावे.

फलटण **(श्रीमती एस. डी. साबळे)**

ता.३१.०८.२०२३ **२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, फलटण.**